# - : जाहिरात : -

## सामाजिक न्याय विभागांतर्गत मागासवर्गीय मुलां/मुलींसाठी शासकीय वसतिगृहांमध्ये सन २०२४-२५ करीत व्यावसायिक अभ्यासक्रमाची ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाद्वारे मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी चालविण्यात येणारी शासकीय वसतिगृहे, शासकीय निवासी शाळा सुरू करण्यात आलेली असून सामाजिक न्याय विभागांतर्गत नागपूर जिल्ह्यात शहरातील मागासवर्गीय मुलां/मुलींची एकूण १४ वसतिगृहे तसेच तालुकास्तरावरील मागासवर्गीय मुलां/मुलींची एकूण ११ शासकीय वसतिगृहे उमरेड, कुही (मुलांचे), कुही (मुलींचे), वानाडोंगरी (मुलांचे), वानाडोंगरी (मुलींचे), नांदा ता. कामठी (मुलांचे), पारशिवनी (मुलांचे), काटोल (मुलींचे), रामटेक (मुलींचे), कळमेश्वर (मुलींचे), सावनेर (मुलींचे) अशा एकूण २५ शासकीय वसतिगृहांकरिता सन २०२४-२५ या शैक्षणिक सत्राकरिता व्यावसायिक अभ्यासक्रम महाविद्यालयीन अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकरिता मोफत प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे. त्यामुळे गरजू व पात्र विद्यार्थिनींकडून अर्ज आमंत्रित करण्यात येत आहेत.

**सन २०२४-२५ या शैक्षणिक सत्रात नागपूर जिल्ह्यातील उपरोक्तप्रमाणे मुलांमुलींच्या एकूण २५ शासकीय वसतिगृहांसाठी संबंधित गृहप्रमुख/गृहपाल यांचेकडून प्राप्त माहितीनुसार यापूर्वी वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या प्रवर्गनिहाय जागा रिक्त जागेत गृहप्रमुख/गृहपाल यांचेकडून अंशतः बदल झाल्याने सद्यस्थितीत संबंधित गृहप्रमुख/गृहपाल यांचेकडून प्राप्त माहितीनुसार रिक्त जागा खालीलप्रमाणे आहेत.**

| एकूण वसतिगृह संख्या | अभ्यासक्रम | SC | मांग | मेहतर | ST | VJNT | SBC | OBC/ EBC | अपंग | अनाथ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २५ | व्यवसाईक | २०१ | ४८ | ७१ | १८ | २० | ५ | २५ | १८ | १२ | ४१८ |
| | बिगर व्यवसाईक | १२० | १४ | ३१ | ७ | १४ | ३ | १० | ८ | ६ | २०३ |
| | एकूण | ३२१ | ६२ | ९२ | २५ | ३४ | ८ | ३५ | २६ | १८ | ६२१ |

शासकीय वसतिगृहाचे ऑनलाइन प्रवेश प्रक्रियाबाबत आज्ञावली विकसनाचे काम प्रगती पथावर असून यामध्ये विद्यार्थ्यांकडून प्राप्त होणारे अर्ज ऑनलाइनरीत्या स्वीकृत करण्याबाबतचे मोड्यूल महाआयटीद्वारे दि. ३०.०७.२०२४ पासून कार्यरत झालेले आहे. त्यानुसार दिनांक ३१.०७.२०२४ पासून https://hmas.mahait.org या पोर्टलद्वारे सन २०२४-२५ या सत्रातील व्यावसायिक अभ्यासक्रमातील रिक्त जागेकरिता ज्या इच्छुक विद्यार्थी/विद्यार्थिनींना शासकीय वसतिगृहात प्रवेश घ्यावयाचा आहे अशा गरजू विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांना ऑनलाइन अर्ज भरता येणार आहे.

ऑनलाइन पोर्टलचे हे प्रथम वर्ष असल्याने चालू वर्ष सन २०२४-२५करिता व्यावसायिक अभ्यासक्रमात अथवा अव्यावसायिक अभ्यासक्रमात शिकत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना ऑनलाइन तसेच ऑनलाइन भरलेल्या अर्जाची प्रिंट पोर्टलवरून डाऊनलोड करून त्याची प्रिंट घेऊन देखील सदर अर्ज नागपूर शहरातील सामाजिक न्याय विभागांतर्गत मुलींचे एकूण ६ शासकीय वसतिगृहे व मुलांचे एकूण ८ शासकीय वसतिगृहांत प्रवेशाकरिता शहराच्या केंद्रभागी **मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, वसंतनगर, चोखामेळा परिसर, दीक्षाभूमी चौक,** नागपूर येथे ग्रामीण भागातील तालुकास्तरावरील एकूण ११ वसतिगृहांत प्रवेशाकरिता संबंधित तालुक्याच्या वसतिगृहातील गृहपाल यांचेकडे सर्व आवश्यक कागदपत्रांसह सादर करावे, असे जाहीर आवाहन सुकेशिनी तेलगोटे, सहायक आयुक्त समाज कल्याण नागपूर या करीत आहेत. अधिक माहितीसाठी संबंधित शासकीय वसतिगृहाचे गृहपाल किंवा सहायक आयुक्त, समाज कल्याण नागपूर या कार्यालयाशी संपर्क करावा.

स्वा/-

**सहायक आयुक्त**

**समाज कल्याण नागपूरकरिता**